महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती
कॅम्प, अमरावती - ४४४ ६०२
शाखा उपजिल्हाधिकारी तथा प्रभारी अधिकारी (भूसंपादन),अमरावती
दुरध्वनी क्रमांक - ०७२१-२६६१६०२ फॅक्स क्र. ०७२१-२६६२८४३
Email :- amravatilao2014@gmail.com Website:-http://amravati.nic.in

क्र.अ.का/प्र.अ./भूसंपादनं/कावि/ ६२४/२०२१ दिनांक :- १६ /०९/२०२१

**आदेश**

**वाचा** :- १.महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार- ब दिनांक ०१ ऑगस्ट २०१६
२.नविन भूसंपादन कायदा २०१३ चे कलम २५ चे परंतुक
३. उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अ.व.प्र.क्र.२, अमरावती यांचे पत्र क्र. मं.अ/विभूसअ (अवप्रक्र२)/ कावि २१/२०२१, दि. ३०/०८/२०२१

**विषय** :- **चांदूर रेल्वे येथील उड्डाणपुलाचे पोचमार्गासह बांधकामाकरीता** प्रकरणामध्ये भूसंपादन कार्यवाही करीता मुदत वाढ मिळणेबाबत.
(भु.स.प्र.क्र. ०८/४७/२०१९-२० मौजा चांदूर रेल्वे ता.चांदूर रेल्वे जि.अमरावती)

ज्याअर्थी, उपरोक्त विषयांचे अनुषंगाने, चांदूर रेल्वे येथील उड्डाणपुलाचे बांधकामाकरीता एकुण क्षेत्र ६२४.०४ चौ.मी. खाजगी जमिन संपादित करणेकरीता मौजा चांदूर रेल्वे या भूसंपादन प्रकरणांअंतर्गत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग, अमरावती यांचेकडील **भु.सं.प्र.क्र. ०८/४७/२०१९-२० मौजा चांदूर रेल्वे ता.चांदूर रेल्वे जि.अमरावती** या प्रकरणामध्ये भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ मधील कलम ११ अधिसूचना दि.२०/०६/२०२० रोजी प्रसिध्द करण्यात येऊन तदूनंतर कलम १९ अधिसूचना दि. ११/०९/२०२० ला प्रसिध्द करण्यात आली. कलम २१ (१) (२) च्या नोटिस काढुन संबंधित सर्व भूधारकांना बजावण्यात आल्या. तसेच अधिसूचना प्रसिध्दी नंतर संबंधित यंत्रणेस प्रकरणामध्ये लागणारा एकुण रु. ८५,७५,५६८/- निधी वारंवार मागणी करण्यात येऊन सुध्दा प्रकरणामध्ये यंत्रणेकडुन २४,१२,५१०/- रक्कम प्राप्त होऊन उर्वरित रक्कम रु. ६१,६३,०५८/- अप्राप्त आहे. विहित मुदतीमध्ये निधी प्राप्त न झाल्यामुळे प्रकरणामध्ये पुढील कार्यवाही करता आली नाही. त्यामुळे दि. ०७/१०/२०२१ रोजी प्रकरण अंतिम निवाडा स्तरावर व्यपगत होत आहे. भूसंपादन कायदा २०१३ अंतर्गत महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग -४ब दिनांक ०१/०८/२०१६ प्रमाणे नियम १४(१) मधील परंतुकानुसार भूमी संपादनाच्या खर्चासंबंधिची उर्वरित रक्कम ही अंतिम निवाडा कार्यवाही पूर्वी जमा करणे आवश्यक आहे, त्याशिवाय अंतिम निवाडा कार्यवाही करता येत नाही, अशी तरतूद आहे.

700
प्रकरण / पत्र / निवेदन
दि.२०/९/२१ रोजी प्राप्त झाले.
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)
अ.व.प्र.क्र.२, अमरावती

ज्याअर्थी, नविन भूसंपादन अधिनियम २०१३ चे कलम २५ चे तरतुदीमधील परंतुकानुसार समुचित शासन कलम १९ चे प्रसिध्दीनंतर निवाडा जाहिर करण्याबाबतचा १२ महिन्यांचा कालावधी योग्य कारणांसह पुढे वाढवू शकते, अशी तरतुद आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची दिनांक ११/०९/२०१५ चे राजपत्रकात प्रसिध्द अधिसूचना क्र.संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७(भाग२)/अ-२, दिनांक ११/०९/२०१५ नुसार जिल्हाधिकारी यांना १०००० हे.आर क्षेत्रापर्यंतचे क्षेत्रापेक्षा जास्त नसलेला भूसंपादनासाठी समुचित शासन म्हणून घोषित केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, सर्व बाबीमुळे प्रकरणामध्ये मुदतवाढ मिळणे आवश्यक असल्याचे संबंधित यंत्रणा तसेच उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अ.व.प्र.क्र.२, अमरावती यांचेकडुन भूसंपादन कार्यवाहीस मुदतवाढ मिळणेकरीता विनंती करण्यात आली आहे.

**त्याअर्थी, आता, उपरोक्त प्रकरणामध्ये वरीलप्रमाणे, विनंती केल्यानुसार व उक्त वस्तुस्थितीनुसार भूसंपादन** अधिनियम २०१३ मधील कलम २५ अंतर्गत तरतूदीनुसार भूसंपादन कार्यवाही करीता समुचित शासन म्हणून कलम १९ चे प्रसिध्दीनंतर निवाडा जाहिर करण्याची मुदत (१२ महिने) संपल्यानंतर निवाडा जाहिर करण्यास्तव दिनांक ०७/१०/२०२१ नंतर पुढील १२ महिनेपर्यंत मुदतवाढ प्रदान करीत आहे. याबाबत सर्व संबंधितांनी योग्य कार्यवाही करावी .

**समुचित शासन तथा**
**जिल्हाधिकारी अमरावती**

**प्रति,**
**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),**
**अ.व.प्र.क्र.२, अमरावती**

**<u>प्रतिलिपी</u> :-** १. मा.विभागीय आयुक्त,अमरावती यांना माहिती करीता सविनय सादर.
२. कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग, अमरावती यांना माहिती तसेच निधी त्वरीत उपलब्ध करुन देणेचे निर्देशासह कार्यवाही करीता.

**समुचित शासन तथा**
**जिल्हाधिकारी अमरावती**